य २५/-

# आंबा व लिंबू वर्गीय फळबाग विशेष

आणि इतर भरपूर माहीतीसह

डिसेंबर - २००८


असेल सोबत मासिक

# गोडवा शेतीचा

तर होईल विकास शेती आणि शेतकऱ्यांचा





शेती व शेतकऱ्यांच्या विकासाचे ध्येय बाळगणारे मासिक

* पुणे * वर्ष २ रे * अंक ८ वा




आंबा मोहोर संरक्षण





पहिल्या प्रयत्नात पौळ बंधुंचा आंबा इंग्लंड-अमेरिकेच्या बाजारात





शानदार सोहळ्यात पद्मश्री आप्पासाहेब पवार पुरस्काराचे वितरण


जिथं गवताचं पातं जीव धरंना,
तिथं जैन ठिबकवर डाळिब बाग मावंना!
डाळींबाच्या बागेत 'जैन ठिबक' बसविण्याचे फायदे
• झाडाच्या अगदी मुळाशी आवश्यक तेवढेच पाणी देता येते
• झाडांची वाढ एकसारखी व जोमाने होते
• लोडशेडींगची झळ बसत नाही
• उष्ण हवामानाशीही संतुलन साधता येते
• तेल्या व मर रोगाला आळा बसतो
• द्रवस्वरूपातील खत देता येत असल्याने खर्चात प्रचंड बचत होते
• फळांच्या देठांना पेशीक्षय होत नाही, त्यामुळे फळ-गळ नियंत्रणात येते
• निरंतर वाफसा राहिल्याने पाण्याचा ताण पडत नाही; परिणामी फळाची वाढ झपाट्याने होते
• निर्यातक्षम दर्ज्याची, टपो-या दाण्यांनी रसरसलेली चमकदार व मोठी डाळींब अवघ्या वीस महिन्यात काढणीला येतात. म्हणूनच तर डाळींब उत्पादकांचं प्रचंड जिव्हाळ्याचं नातं जडलय ते जैन ठिबक'शी.
डाळिंबाचं दाणं दाट... जैन ठिबकची करामत फास्ट!
जैन ठिबक®
पाणी थेंबानं पीक जोमानं®
जैन इरिगेशन सिस्टिम्स् लि., जैन प्लास्टीक पार्क, पो. बॉ. ७२, जळगांव - ४२५००१,
फोन : ०२५७-२२५८०११, ई- मेलः jisl@jains.com; वेबसाईटः www.jains.com
शासकीय नियमानुसार अनुदान उपलब्ध
कार्यालयः अहमदनगरः ०२४१-२४१५४८१; अमरावतीः ०७२१-२६७४७३७; औरंगाबादः ०२४०-२३४५१३६; लातूरः ०२३८२-२२४०९८; मुंबईः ०२२-२२१२९०९०; नागपूरः ०७१२-६४५०८४३; नांदेडः ०२४६२- २७४०४६; नाशिकः ०२५३-२५९७५०३; पंढरपूरः ०२१८६-२२२६३१; रत्नागिरीः ०२३५२-२३००३३; सांगलीः ०२३३-२३३३४७७; सोलापूरः ०२१७-२३५७३९५; ठाणेः ०२२-२५४४३९९२.
जैन पाईप
जैन ठिबक
जैन पीई पाईप
जैन स्प्रिंकलर
जैन टिश्यूकल्चर
Chapin Drip Irrigation USA
API Drip Irrigation USA
PEPCO Drip Irrigation USA
NAANDANJAIN Drip Irrigation ISRAEL


18CM X 26CM

*आप्पासाहेब पुरस्कार प्रदान करतेवेळी केलेले भाष्य..*

# उच्च तंत्रज्ञानाला जवळ केल्याशिवाय शेतकऱ्यांचा उद्धार नाही

**-केंद्रीय कृषी ना.मंत्री शरद पवार**

*जळगाव (प्रतिनिधी)- भारतातील ६४ टक्के लोक शेती व्यवसायावर अवलंबून असून त्यांची प्रगती झाल्याशिवाय देशाची प्रगती होणार नाही. देशाची प्रगती जर करायची असेल तर शेती व शेतकऱ्यांकडे अधिक लक्ष द्यावे लागेल असे निस्सांदिग्ध प्रतिपादन केंद्रीय कृषीमंत्री शरद पवार यांनी केले.* शेतकरी हे केवळ अन्नादाताच नाही तर ती एक मोठी क्रयशक्ती आहे. जवळपास ६० टक्के शेतकरी वर्गाच्या माध्यमातून असलेली मोठी शक्ती बाजारपेठेपासून जर दूर असेल तर प्रगती कशी होईल असा सवालही त्यांनी उपस्थित केला.



पद्मश्री कै. डॉ.आप्पासाहेब पवार आधुनिक कृषि उच्च तंत्र पुरस्कार प्रदान सोहळ्यात ते बोलत होते. महाराष्ट्राचे कृषी मंत्री बाळासाहेब थोरात, उच्च व तंत्र शिक्षण ऊर्जा मंत्री दिलीप वळसे पाटील, जैन इरिगेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ.भवरलाल जैन, खा. वसंतराव मोरे, खा. हरिभाऊ जावळे, आ.सुरेशदादा जैन, जैन चॅरिटीज्‌चे विश्वस्त ना.धो. महानोर, पुरस्कार प्राप्त सत्कारमूर्ती, विश्वासराव आनंदराव पाटील, व त्यांच्या धर्मपत्नी सौ. निर्मलाबाई, भगवानराव यशवंतराव क्षीरसागर व त्यांच्या धर्मपत्नी सौ. तुळसाबाई, पुरस्कार निवड समितीचे अध्यक्ष माजी कुलगुरू डॉ.शंकरराव मगर आदींची प्रामुख्याने उपस्थिती होती.

आप्पासाहेब पवार,अण्णासाहेब शिंदे, स्वामीनाथन सारख्या कृषी तज्ज्ञांच्या योगदानामुळेच अन्नधान्याच्या बाबतीत आपला देश स्वयंपूर्ण झाला. तथापि, पुन: या क्षेत्राकडे दुलर्क्ष झाल्याने दुर्दैवाने अन्नधान्य आयात करण्याची वेळ आली यावर मात करण्यासाठी अधिकाधिक उत्पन्न घेण्यासाठी पर्याय नव्हता. कृषी क्षेत्रातील उच्चतंत्र व पाण्याच्या नियोजनामुळेच आज देश पुन्हा धान्याच्या कोठाराने भरला आहे, असे पवार यांनी सांगितले.

आप्पासाहेब पुरस्काराच्या निमित्ताने निवड झालेल्या शेतकऱ्यांच्या माध्यमातून पुन्हा एकदा कोरडवाहू शेतीही फायद्याची ठरू शकते हे सिद्ध झाले आहे. प्रतिकूल परिस्थितीवर मात करीत पाटील व क्षीरसागर या शेतकऱ्यांनी उत्तम काम केले आहे. केवळ स्वत:चे शेतच नव्हे तर इतरांचेही जीवन समृद्ध होण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले आहेत. अशा आदर्श शेतकऱ्यांची निवड झाल्यामुळे पुरस्काराचीही प्रतिष्ठा वाढली असल्याचे गौरवोद्‌गार त्यांनी काढले. कोरडवाहु शेतीतूनही अधिकाधिक उत्पादन घेण्यासाठी ठिबक सिंचन हा मूळ मंत्र आहे. हा आधुनिक कृषि उच्च तंत्राचा मंत्र आप्पासाहेबांनी दिला. भवरलाल जैन यांनी हे तंत्र अधिकाधिक शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला आहे. जैन इरिगेशनचे ठिबक सिंचनातील योगदान मोलाचे असल्याचेही पवार यांनी सांगितले.

या पुरस्काराच्या माध्यमातून दोन्ही शेतकऱ्यांनी अधिक काम करण्याची उर्मी दाखविली आहे. इतर शेतकऱ्यांसाठी ते प्रेरणास्थानी आहेत. इतर शेतकऱ्यांना प्रेरणा देण्याचे, ठिबक सिंचन सारख्या उच्च तंत्राचा प्रसार करण्याचे कार्यही ते करत आहेत. उच्च तंत्र प्रसाराच्या या कार्याची खऱ्या अर्थाने राष्ट्रीय गरज असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

आप्पासाहेब पवार हे शेती व शेतकरी विकासासाठी झपाटलेले व्यक्तिमत्व होते. कृषी विकासात आप्पासाहेबांचा वाटा हा महत्वाचा आहे हे लक्षात घेत त्यांचा हा विचार सर्वदूर



श्री. विश्वासराव आनंदराव पाटील, मु. पो. लोहारा ता. पाचोरा, जि. जळगाव, मो. ९७६३४७५७६४

पोहोचविण्याचे कार्य या पुरस्काराच्या माध्यमातून यशस्वीपणे होत असल्याचे महाराष्ट्राचे कृषीमंत्री बाळासाहेब थोरात यांनी सांगितले. पुरस्कारप्राप्त पाटील, क्षीरसागर हे केवळ प्रगतिशील शेतकरी नाही तर ते एक विद्यापीठच आहे. *मृदसंधारण व जलसंधारण म्हणजे काय हे जालना जिल्ह्यातील कडवंचीला गेल्यावर समजते.* शेतीपुढे आजची आव्हाने निर्माण झाली आहेत त्या सर्वांना जल संधारणाचाच पर्याय मोलाचा आहे. जैन ठिबक सिंचनाच्या सहाय्याने एकरी ४० क्विंटल कापूस शेतकऱ्यांनी घेऊन दाखवला आहे. ठिबक सिंचनाला जवळ केल्यास राज्याची शेती बदलायला वेळ लागणार नाही. सर्व प्रश्नांवर उपाय हा ठिबक सिंचनच असल्याचे पद्मश्री भवरलाल जैन यांचे मत आता आम्हाला पटले असल्याचे गौरवाद्गारही थोरात यांनी काढले. पाण्याचे महत्त्व ओळखून पद्मश्री भवरलाल जैन यांनी ठिबकच्या माध्यमातून सुरू केलेल्या जैन इरिगेशनचा आता वटवृक्ष झाला असल्याचेही कृषीमंत्र्यांनी नमूद केले.



श्री. भगवानराव यशवंतराव क्षीरसागर - मु. पो. कडवंची ता. जि. जालना, ९४२२२२६५५१

जोपर्यंत शेतीला सन्मान मिळत नाही तोपर्यंत शेतकऱ्याला चांगले दिवस आले असे म्हणता येणार नाही. शेतकऱ्याला व शेतीला चांगले दिवस आणण्यासाठी आप्पासाहेबांनी महत्त्वपूर्ण कार्य केले असल्याचे जैन इरिगेशनचे संस्थापक अध्यक्ष भवरलाल जैन यांनी आपल्या प्रास्ताविकात सांगितले. सुमारे पंचवीस वर्षापूर्वी माझी व आप्पासाहेबांची पहिली भेट कृषी प्रदर्शनाच्या निमित्ताने अमेरिकेत झाली. या पहिल्या भेटीतच कृषी क्षेत्रातील त्यांची दुरदृष्टी माझ्या लक्षात आली. आप्पासाहेबांनी केलेले कार्य हे आमच्या प्रेरणास्थानी आहे. त्यांच्या कार्याला, विचाराला व आधुनिक कृषी उच्च तंत्रज्ञानाला पुरस्काराच्या माध्यमातून शेतकऱ्यांपर्यत पोहोचविण्याचा आम्ही प्रयत्न करीत असल्याचे भवरलाल जैन यांनी सांगितले. **

## आप्पासाहेब पुरस्काराचे व्यासपीठाची उभारणी, रचनाच एका प्रगत शेतकऱ्याच्या आदर्श शेतीच्या पार्श्वभूमिवर

पुरस्कार प्रदान सोहळ्याच्या निमित्ताने व्यासपीठाची रचनाच एका प्रगत शेतकऱ्याच्या आदर्श शेतीच्या पार्श्वभूमिवर करण्यात आली होती. उच्च तंत्रज्ञान व ठिबक सिंचनावर टिश्युकल्चरची बहरलेली केळीची हिरवीकंच रोपे, या शेतातच साकारलेले एक झोपडी वजा घर, अंगणातच असलेली विहीर, विजेच्या संकटावर मात करण्यासाठी या शेतकऱ्याने जवळ केलेला शाश्वत सौर ऊर्जेचा मंत्र, हा कार्यक्रमाला साजेसा होता. आप्पासाहेबांनी ज्या अत्याधुनिक तंत्रज्ञानावर बहरलेल्या शेतीचे स्वप्न पाहिले होते त्याची प्रतिकृतिच व्यासपीठावर उभारण्याचा निर्णय जैन इरिगेशनचे उपाध्यक्ष अशोक जैन यांनी घेतला. केवळ तीन दिवसांच्या अथक परिश्रमातून तो साकारही केला. यात विशेष म्हणजे शेतातील आकर्षक बैलगाडी व झोपडीवरील आप्पासाहेबांचे छायाचित्र उठून दिसत होते. शेती परिसरातच दाखविण्यात आलेल्या या परिसरात टिश्यू कल्चरची डाळिंब व आंतरपिक म्हणून घेतलेले गव्हाचे पीकही उठून दिसत होते. संपूर्णत: नैसर्गिकरीत्या उभारण्यात आलेली व्यासपीठ हे उपस्थितात चर्चेचा व कौतुकाचा विषय ठरला. यात प्रामुख्याने चक्क बैलजोडींचा व गाईचा गोठाही व्यासपीठाच्या शेजारी साकारला. केंद्रीय कृषीमंत्री शरद पवार व इतर मान्यवरांच्या नजरा या दृश्यावर खिळल्या व त्यांनी याचे न विसरता खाजगीत कौतूकही केले. जैन इरिगेशनच्या आजवरच्या परंपरेला कायम ठेवत पुन्हा एकदा याही क्षेत्रात या निमित्ताने वर्चस्व सिद्ध झाले.

***

# महाराष्ट्राच्या शेतीतील गंभीर समस्या

व्ही. बी. पाटील – एम. एस. सी. (कृषी)
वरीष्ठ व्यवस्थापक, कृषी संशोधन व प्रशिक्षण विभाग, जैन हिल्स, जैन इरिगेशन सिस्टीम्स लि., जळगाव.
दूरध्वनी मो– ९४२२७७६७३२

महाराष्ट्राचा एकूण भौगोलिक हवामानानुसार ६ विभाग पडतील (१) पश्चिम महाराष्ट्र (पुणे, सातारा, कोल्हापूर, सांगली) (२) नगर– सोलापूर, (३) नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव, (४) मराठवाडा (औरंगाबाद, जालना, बीड, हिंगोली. उस्मानाबाद, लातूर, परभणी, नांदेड), (५) विदर्भ : बुलढाणा, अकोला, वाशिम, अमरावती, यवतमाळ, वर्धा, नागपूर, चंद्रपूर, भंडारा, गडचिरोली, (६) कोकण किनारा : ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

या विविध विभागातील जमीनी, पिके पडणारा पाऊस, तापमान विविध आहेत.

महाराष्ट्रात एकूण सिंचन क्षमता ही केवळ १३ –१४ टक्के एवढीच आहे. जवळपास ६५ टक्के सिंचन हे विहीरीवर अवलंबून आहे तर केवळ ३५ टक्केच सिंचन हे धरण कालवे यावर अवलंबून आहे.

कोकण विभाग, खानदेश, विदर्भ ह्या तीनही विभागांत धरणाची संख्या कमी आहे. मराठवाड्यातील जायकवाडी सोडल्यास तो भागसुद्धा सिंचना अभावी कोरडाच आहे.

शेती समस्या विविध आहेत त्यापैकी प्रमुख समस्या आपण बघू या ;


**१) हवामानातील महत्वाचे बदल :** पृथ्वीचे तापमान वाढले आहे. महाराष्ट्रांत सुद्धा हे अनुभवले जात आहे. पावसाळा हा १२० दिवसाचा कालावधी (एकुण) होता. तो आता एकूण ८०–९० दिवसावर येऊन ठेपला आहे. हवामानांत बदल मोठ्या प्रमाणावर झालेले आहेत. त्यामुळे पीक रचना, वाण (जाती), पाणी व्यवस्थापन, लागवडीच्या तारखा, पीकक्रम किडी रोगांचा प्रभाव हे सार बदलेले आहे.

केवळ पावसाच्या पाण्यावर शेती जास्त क्षेत्र अवलंबून राहू नये याची काळजी घ्यावी लागणार. मध्यम व लघुसिंचन पाणलोट क्षेत्र, शेततळी हे कार्यक्रम अग्रक्रमाने मोठ्या प्रमाणावर हाती घ्यावे लागणार. भूगर्भ पातळी पुर्नभरण पावसाचे पाणी अडविणे, जिरविणे ही महत्वाची कामे आहेत. पाण्याचे स्त्रोत निर्माण करणे. तरच पिकांना संरक्षित पाणी तरी देता येईल.

तापमानातील बदल बरेच काही सुचवितात. आर्द्रता वाढणे, रात्रीचे तापमान वाढणे, केवळ ढगाळच हवामान बरेंच काळ टिकून राहणे ह्या बाबी पिकांसाठी धोकादायक तर आहेच पण किडी आणि रोगांना पुरक पण आहेत.

हवामानाचा अभ्यास करूनच शेतीतल नियोजन, पीक

## कृषिराज रोपवाटिका



आमचेकडे पपई (तैवान–७८६), टोमॅटो, मिरची, वांगी,
भाजीपाला, फळझाडे व फुलझाडांची बनवलेली दर्जेदार, निरोगी रोपे मिळतील.
सिंजेन्टा, नामधारी, सेमिनीस, इन्डोअमेरीकन, नोयु सीडस्, इ. नामवंत कंपन्यांच्या बियाण्यांपासून बनवलेली रोपे ऑर्डर प्रमाणे प्लास्टीक ट्रे मध्ये आधुनिक पद्धतीने रोपे तयार करून मिळतील.

संपर्क– विपुल कुलकर्णी
९२७००४९३७३, ९८६०७३५६३६, ९३२६९२४५२६
म्हेत्रे वस्ती (अहिल्या नगर), जामखेड– कर्जत रोड, जामखेड जि. नगर

नियोजन असावे.

**२) पाण्याचे साठे, सिंचन पद्धती :-** महाराष्ट्रातील बहुतेक धरणे (मुंबई जवळची वगळता) पिकासाठी सिंचनासाठी बांधली गेलीत. पण आज मितीला ही धरणे केवळ पिण्याच्या पाण्यासाठीच वापरली जाऊ लागली. प्रत्येक मोठ्या शहरालगत तलाव, जंगलात धरणे बांधून पिण्याच्या पाण्यासाठीच वापरली जाऊ लागली. शेतीला पाणी हे धरणातून ६० - ७० टक्के तरी पिकासाठीच मिळावे. स्वातंत्र्यापासून ६० वर्षात आम्ही लोकांना पिण्याचे पाणी पुरवू शकत नाही ही आमची शोकांतिका ? शहरे पोसण्यासाठी खेड्यांवर अन्याय का? शहरांत पाण्याचा अपव्यय जास्त आहे. शहरातील वापरलेले पाणी सुद्धा पुन: शुद्धीकरण करून शेतीसाठी वापरले जावे.

पुर्न:भरण हा प्रथम क्रमांकाचा विषय असावा. भूगर्भातील साठे पुर्ववत करावेत. पुरांचे अतिरिक्त पाणी समुद्राकडे जाऊ नये. नगदी पिकांसाठी कार्यक्षम पद्धतीनेच सिंचन व्हावे. ऊसासारखी पाणी पिणारी पिके सक्तीने स्पिंकलर आणि ठिबकवरच घेता यावी. तसा कायदा असावा. धरणातून पाणी पीकावर ठिबक आणि स्प्रिंकलरसाठी मोजून द्यावेत (Volumetric basis) उघड्या मातीतील कॅनालपेक्षा पाणी मोठ्या व्यासाच्या पाइपद्वारे वाहून न्यावे. ज्या प्रांतात ज्यादाचे पाणी आहे तिथून ते रेल्वे रुळालगत पाइप लाईन टाकून दुष्काळी भागाला पुरवावे. उत्तरेतील अतिरिक्त पाणी मध्यप्रदेश मार्गे महाराष्ट्रांत सहज येऊ शकेल. असे भागीरथ प्रयत्न करण्याची गरज आहेच.

पीक रचना करतांना सर्व प्रकारची पीके घेण्याचा प्रयत्न व्हावा. नगदी पिकासाठी अन्नधान्ये क्षेत्र कमी करू नये. ऊस, कापूस क्षेत्र मर्यादीत असावे. गुजराथ राज्य २० लाख हेक्टर कापूस क्षेत्रातून २० लाख गासड्या कापूस उत्पादन करू शकते तर मग महाराष्ट्रात ३१ - ३२ लाख हेक्टर कापूस क्षेत्र १८-१९ लाख गासड्याच उत्पादन देते. यात बदल व्हावा. क्षेत्र कमी करून ते ठिबक पद्धतीवर आल्यास कमी क्षेत्रांतून जास्त उत्पादन मिळू शकेल. तीच परिस्थिती थोड्या फार फरकाने ऊसाबाबत आहे.

ठिबक आणि स्प्रिंकलरसाठी अनुदान रक्कम तर वाढवावीच त्यासोबत नियम, अटी, शर्ती शिथिल व्हाव्यांत. खाजगी कारखानदारीचा सहभाग सिंचन व्यवस्थेसाठी जोडला जावा (Public Private Partnership) ठिबक आणि स्प्रिंकलरचा कार्यक्षम वापर सर्व पिकांसाठी व्हावा.

**३) समतोल खते :** - केवळ सेंद्रीय किंवा केवळ रासायनिक खतांवर शेती होणार नाही. रासायनिक खतांना सेंद्रीय खतांची जोड द्यावी लागणारच. जमिनीचा मगदूर, पोत कायम टिकविण्यासाठी सेंद्रीय खते आवश्यकच आहे. सेंद्रीय खत निर्मितीसाठी चालना मिळवी प्रत्येक तालुका बीजगुणन क्षेत्रावर कंपोष्ट आणि गांडूळखत प्रकल्प पथदर्शक म्हणून उभे रहावेत. बियाण्यासोबत सक्तीने जीवाणूखते द्यावीत.

रासायनिक खते गरजेप्रमाणे पुरविली जावी. सर्व प्रकारची खते उपलब्ध असावी. केवळ युरीयाचाच पुरवठा अधिक केला जातो. दुय्यम व सुक्ष्म अन्नद्रव्येपण गरजेची असतात. उत्पादन, वितरण, पुरवठा हे योग्य नियोजन बद्ध असावे. यासाठी शास्त्रीयज्ञान शेतकऱ्यांनी प्राप्त करावे. जिथे शक्य आहे तिथे ठिबक मधून पाण्यातून विद्राव्य खते द्यावीत. पिकावर फवारणीद्वारे सूक्ष्म अन्नद्रव्ये फवारावीत.

**४) बी, बियाणे, रोपे :-**

प्रत्येक पिकातील उन्नतवाण, दर्जेदार बियाणे ही जबाबदारी शासन कृषी विभाग कृषी विद्यापीठे यांची आहे. बियाणे महामंडळ हा प्रयोग पण अयशस्वी ठरला आहे. खाजगी कंपन्यांची यावर घट्ट पकड आहे. त्यामुळे नाईलाजाने शेतकऱ्याला खाजगी संस्थाकडेच जावे लागते.

शासन, बीजोत्पादन, नवीन संशोधन ही स्पर्धा खाजगी संस्थाबरोबर असावी. बियाण्याच्या किंमती फार आहेत. बीयाणे कायद्यांत बदल व्हावेत. उन्नत वाणाचे बी सहज उपलब्ध नाही. उपलब्ध झाले तरी ते महाग आहे. सर्वसामान्य शेतकऱ्यांना ह्याबाबत माहिती नाही.

**५) छोटी अवजारे, सहज परवडणारी :-**

प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी तालुक्याच्या ठिकाणी कृषी औद्योगिक संस्थेमार्फत भौगोलिक परिस्थितीला योग्य अशी अवजारे निर्माण व्हावी. फार अवजड, महागाची अवजारे सामान्य माणसे विचारांत घेऊ शकत नाहीत. ही काळाची गरज आहे आणि हे दुर्लक्षित आहे.

**६) मार्केटिंगसाठी सुविधा :-** शेतीमाल उत्पादने कशी साफ करावीत, साठवावीत, पॅकिंग आणि मालावरील ॲडव्हान्स ह्या गरजा आहेत. याबाबत शेतकऱ्यांना योग्य मदत मिळत नाही. आज उपलब्ध असलेली मार्केट यार्ड ही हमाल, मापाडी, अडते आणि व्यापारी यांचीच मक्तेदारी आहे.

**७) बँकींग सुविधा, सहज कर्ज :-** बँकेचा शेतीकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलावा. सरकारी अनुदान जे शेतकऱ्यांना मिळणार आहे ते परस्पर बँकेत शेतकऱ्यांच्या खात्यावरच जमा व्हावे.

**८) शेतीबाबत आदर्श प्रशिक्षण :-** शेतीतील नवीन तंत्रज्ञान पसरविण्यासाठी प्रात्याक्षिके, चर्चासत्रे, प्रदर्शन, शिवार फेरी हे उपक्रम सातत्याने राबविण्याची गरज आहे. प्रात्याक्षिकांसह ट्रेनिंग ही महत्वाची गरज आहे. त्याला प्राधान्य मिळावे. केवळ सहली नकोत. ****